REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# प्राचीन कालखंडात विदर्भात बौद्ध धर्माचा प्रचार प्रसार

डॉ. नलिनी टेंभेकर
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

## सारांश

विदर्भातील बौद्ध धर्माच्या प्रसाराचा अभ्यास करतांना असे दिसुन येते की, पवनी येथील जगन्नाथ टेकडी महास्तुप हा तत्कालीन भारतातील सर्वात मोठ्या स्तुपांपैकी एक होता व तो गौतमबुद्धाच्या अस्तीवंर किंवा गौतम बुद्धाच्या एखाद्या प्रसिद्ध शिष्याच्या अस्तीवंर बांधला गेला होता. मौर्य काळात पवनी, अडम व देवटेकला अधिक महत्व प्राप्त होते. सातवाहन काळात आर्थिक समृद्दी होती. बौद्ध व्यापारी आणि जनसामान्यांनी केलेल्या दानातून अनेक चैत्यगृहे व विहारांची निर्मीती झाली. नागार्जुनासारखे बौद्ध पंडित याच वैदर्भीय भुमीची देण होय. विदर्भातील रामटेक, मनसर, माहुरझरी मांढळ, भद्रावती इत्यादी ठिकाणे बौद्ध धर्म प्रसाराची केन्द्रे होती.

एकंदरीत इसवी सन पूर्व ५ व्या ते इसवी सनाच्या ६ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्म हा विदर्भातील एक प्रमुख धर्म होता.



## प्रस्तावना

विदर्भ हा महाराष्ट्र राज्याच्या एक भाग असुन त्यात नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, चंद्रपूर व गडचिरोली या अकरा जिल्ह्यांचा समावेश होतो. आर्य संस्कृतीच्या दक्षिणेतील प्रचार व प्रसाराचे हे स्थळ होते. विदर्भ हा एक प्राचीन प्रदेश आहे. विदर्भ नामक राजाने या प्रदेशात आर्यांच्या वसाहती करून हा प्रदेश भरभराटीला आणला म्हणुन त्यांला विदर्भ असे नाव पडले अशी आख्यायिका आहे.[1] महाभारत काळात या विदर्भावर सोमवंशीय भोज लोकांचे राज्य होते. भोज राजांच्या नावावरुन प्राचीन काळी विदर्भाला'भोजकट' असेही म्हणत.[2]या नंतर विदर्भया प्राचीन जनपदावर मौर्य, शुंग,सातवाहन, वाकाटक, कलचुरी, मुंड, राष्ट्रकुट इत्यादींनी राज्य केले.

## मौर्य (इ.स. पूर्व ३२२- २३०)

विदर्भाचा प्राचीन ज्ञात इतिहास अशोकाच्या काळापासून सुरु होतो. इ.स. पूर्व तिस-या शतकात विदर्भ सम्राट अशोकाच्या साम्राज्यात मोडत होता. हया काळात प्रचलित असलेली तांबे व चांदीची आहत पंचमार्क नाणी विदर्भात सर्वत्र मिळाली आहेत. अशोकाच्या महामात्राने (प्रदेशाधिपतिने) कोरलेला शिलालेख चद्रंपूर जिल्हयातील देवटेक येथे मिळाला आहे. यावरुन हा प्रदेश अशोकाच्या साम्राज्याअंतर्गत होता हे स्पष्ट होते.यानंतर शुंग घराण्याचे शासन विदर्भावर होते.शुंगानंतर सातवाहनांचा उदय झाला.

सातवाहन काळी कलिंग नरेश खाखेलने आपल्या शासनाच्या दुस-या वर्षी विदर्भावर स्वारी केली होती. त्याचे सैन्य कन्हवेना नदीपर्यंत चालत गेले व

असिकनगरचा विध्वंस केला होता.[३]असिकनगरहे आजचे अडम होय व कन्हवेण्णा ही नागपूर जवळची कन्हान व वेणा नदी होय. यांचा संयुक्त प्रवाह प्राचीन काळी कन्हवेण्णा नावाने ओळखला जात असावा.

पवनी येथे महाक्षत्रप रुपिअम्मचा ख्रिस्तोत्तर दुस-या शतकातील छायास्तंभ मिळाला आहे. महाक्षत्रप रुपिअम्म हा शकवंशीय असून कृषाणांली विदर्भावर नेमलेला प्रतांधिकारी होता. कुषाणांची काही काळ विदर्भावर सत्ता होती हे यामुळे ज्ञात झाले आहे.

सन २३० च्या सुमारास सातवाहन राजवटीचा अंत होवून मुंड घराने सत्तेवर आले. सन २७० च्या सुमारास वाकाटक वंशातील प्रथम विंध्यशक्तीचा पुत्र प्रवरसेन याने विदर्भावर स्वारी करुन मुंड वंशाचा पराभव केला आणि आपले राज्य विदर्भावर स्थापिले.[४]वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेची राजधानी रामटेक जवळ नंदिवर्धन किंवा नगरधन हे गाव होते.दुसरी शाखा वत्सगुल्म(वाशीम) येथे राज्य करीत होती. व्दितीय चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावती गुप्ता वाकाटक राजपुत्र व्दितीय रुद्रसेन यास दिली होती. त्याचा मृत्यू राज्यरोहना नंतर थोडयाच वर्षात झाला. त्याची अल्पावयीन मुले दिवाकर सेन व दामोदर सेनच्या वतीने प्रभावती गुप्त राजकारभार पहात असे.दामोदरसेन हा व्दितीय प्रवरसेन या नावाने गादीवर आला. त्याने नंदिवर्धनहून प्रवरपूर (पवनार) येथे आपली राजधानी नेली. व्दितीय प्रवरसेनानंतर नरेंद्रसेन गादीवर आला. त्याचे साम्राज्य उत्तरेस मालवा, मेकल व कोसल प्रदेशावर पसरले पण शेवटी नल नृपती भवदत्त वर्मा याने विदर्भावर स्वारी केली व नंदिवर्धन काबीज केले. पण त्यांच्यानंतर आलेल्या वाकाटक राजा पृथ्वीषेनाने तो प्रदेश पुन्हा जिंकला व प्रवरपूराहून पद्मपुर (आमगाव जवळ जिल्हा भंडारा) स्थलांतरित केली. यानंतर ज्येष्ठ शाखेचा प्रदेश वल्सगुल्म शाखेच्या साम्राज्यात विलिन केला गेला.ज्येष्ठ शाखेने १६० वर्षे राज्य केले.

वत्सगुल्म शाखेचा मुळ पुरुष सर्वसेन हा प्रथम प्रवरसेन याचा पुत्र होता.हरिषेण हा या शाखेचा शेवटचा राजा होता. त्याचे राज्य विस्ताराने फार मोठे होते. त्याचा बौध्द धर्मीय मंत्री वराहदेव याने अजिंठा येथील १६व्या क्रमांकाचे लेणे खोदून त्याला शिल्पादिकांनी भूषविले.

वाकटकांच्या अस्तानंतर इ.स. ५५० च्या सुमारास महिष्मतिच्या कलचुरींचे राज्य विदर्भात प्रस्थापित झाले. इ.स. ६२० च्या सुमारास बदामीचा चालूक्य नृपति व्दितीय पुलकेशी याने कलचुरींचा पराभव करुन तीन महाराष्ट्र आपल्या राज्यात जोडल्याचे वर्णन ऐहोळefçe}}sKeele आले आहे.

यानंतर विदर्भावर राष्ट्रकुटांची सत्ता स्थापन झाली. (इ.स.७५०-९७४) राष्ट्रकुटानंतर कल्याणीचे चालुक्यउदयास आलेत. १२ व्या शतकाच्या अखेरीस देवगिरीचे यादवांची सत्ता विदर्भावर स्थापन झाली.

विदर्भातील बौध्द प्रचार-प्रसाराची माहिती खालीलप्रमाणे आहे.

## सालबर्डीची बौध्द गुंफा

अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्याच्या उत्तर-पूर्वेकडे असलेल्या सातपुडा पर्वताच्या शेवटच्या रांगेत मांडू आणि गंगा नदीच्या काठावर आठ सुदंर गुंफा आहेत. त्यातील सहा बौध्द धर्माशी सबंधीत आहेत. त्यातील दोन पुर्णपणे निर्मीत , एक अर्धवट तयार आणि उर्वरित तीन नवीन बांधकाम करुन मंदिरात परावर्तीत केली आहे.

दोन पुर्णत निर्मीत गुंफा मधील एक गुंफा आता पंचावतार गुंफा म्हणून ओळखली जाते व ती आता महानुभव पंथा (चक्रधर स्वामी) च्या अनुयायांच्या नियत्रंणात आहे. गुंफेत व-हांडा (अर्धमंडप) मंडपव्दार त्याच्या पूर्व आणि पश्चिमेकडे कक्ष, गर्भगृहव्दार आणि गर्भगृह स्तंभ व छत समाविष्ट आहे.गर्भगृहासमोर आज श्रीकृष्ण प्रतिमा आहे. त्याच्या मागील पडदा बाजूला केल्यास टॉर्चच्या प्रकाशात आयताकार असलेले लहान गर्भगृहात प्रवेश करता येतो त्यात भिंतीत बुध्द, पद्मपाणी आणि वज्रपानी यांच्या प्रतिमा कोरलेल्या दिसतात.

हया गुंफा प्रथम हीनयान पंथीयांव्दारे बनविल्या गेल्या व नंतर गर्भगृह आणि प्रतिमा निर्माण कार्य महायान पंथीयांनी केले असावे.[५]. वरील गुंफेच्या पश्चिमेस अर्ध्या कि.मी.अंतरावर लंकेश्वर नामक भव्य गुंफा आहे. गुंफेच्या समोर भव्य अंगण आहे त्यांनतर व-हांडा आहे व व-हांडयाच्या दोन्ही बाजुस दोन लघु कक्ष आहेत. व-हयांडयांच्या मधोमध विहारात प्रवेश करण्यासाठी प्रवेशव्दार आहे. प्रवेशव्दारातून आत गेले असता ४०X४० फुटाचे (१६०० वर्ग फिट) भव्य विहार आहे. विहाराच्या तिंन्ही दिशांना तीन उपकक्ष आहेत. मधलाकक्ष अपूर्ण आहे, बहुदा त्यात प्रतिमा

स्थापण केली असावी. सातवाहन काळात गुंफेची निर्मिती झाली असावी. या गुंफेचे अजिठयांच्या ११ व्या गुंफेशी साधर्म्य सांगितले जाते.[६]

## पातुर ची गुंफा

अकोला जिल्हयातील पातुर हया गावाच्या उत्तरेला तीन कि.मी. अंतरावर एका पर्वताला कापून ही गुंफा बनविलेली आहे. गुंफा ८० फुट लांब, ५५ फुट रुंद आणि १५ ते २० फुट उंच आहे. गुंफेच्यापुढे अंगण आहे व गुंफेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक संरक्षक भिंत ही बनविलेली दिसते. तीची रुंदी अडीच फुट आहे. आतील बाजूला दोन मोठे विहार आहेत व त्याच्या दोन्ही बाजुला L आकारात दोन मोठया गुंफा कोरलेल्या आहेत. दक्षिणेकडील पहिल्या विहारात दोन मोठे व-हांडे आहेत. त्या समोर गर्भगृह आहे. परंतु त्यात प्रतिमा किंवा प्रतिक चिन्हे नाहीत. या विहाराच्या प्रवेशव्दारावर ब्राम्ही लिपीत काही अक्षरे कोरलेली आहेत. त्यावरुन ही गुंफा सातवाहन काळातील पहिल्या-दुस-या शतकातील असावी. दुसरा विहार ही या प्रमाणेच असुन गर्भगृहात पदमासनातील एक प्रतिमा स्थापित होती. जी नंतर विकृत केली गेला. ती भगवान बुध्द किंवा जैन तीर्थकरांची असावी[७]. ब्रिटीश काळापासून ही गुंफा केंद्रसरकारव्दारे संरक्षित स्मारक आहे.

## विजासन गुंफा,भद्रावती

ही विदर्भातील सर्वात भव्य गुंफा आहे. भद्रावतीपासून ३ कि.मी. अंतरावर विजासन नावाच्या टेकडीत ही गुंफा कोरलेली आहे.टेकडीच्या मध्यभागी असलेल्या हया पुर्वमुखी गुंफेच्या आत उत्तर,पश्चिम आणि दक्षिण दिशेला तीन गुंफा कोरलेल्या आहेत आणि त्यात प्रत्येकी तीन विशाल बुध्द प्रतिमा स्थापित आहेत. गुंफेत मंडप,अंतराळआणि गर्भगृह अशी रचना आहे. गर्भगृहात १५८ से.मी. उंच बुध्द प्रतिमा पदमासनात आणि ध्यानमुद्रेत विराजमान आहे. मध्यवर्ती गुंफेत मंडप अंतराळ आणि गर्भगृह अशी रचना आहे. प्रवेशव्दारातून आत गेले असता एक कक्ष आहे.हया कक्षाच्या दोन्ही बाजूला दोन छोटे कक्ष आहेत त्या कक्षांत झोपण्यासाठी उंच चबुतरा बनविलेला आहे. त्यावरुन हे कक्ष भिक्षुंच्या झोपण्यासाठी उपयोगात आणले जात असावेत.गर्भगृहात उंच ठिकाणी भगवान बुध्दाची दगडातील प्रतिमा आहे.

डावीकडील गुंफा सगळयात लहान असून मंडप अंतराळ आणि गर्भगृह अशा रचनेत आहे. मंडपाच्या डावीकडे आसनयुक्त भिक्षुगृह आहे. त्याच्या समोर अंतराळ आहे. गर्भगृहात चबुत-यावर १.५० मी. उंच पदमासनातील ध्यानमुद्रेतील बुध्द प्रतिमा कोरलेली आहे. गुंफेच्या दर्शनी भागात वरील बाजूस तीन स्तूप कोरलेले दिसून येतात.

विजासन गुंफेत प्रतिकाच्या रुपात स्तुपाचे अंकन ठिकाठिकाणी दिसुन येते. त्यावरुन असे दिसून येते की प्रथम ही गुंफा हिनयानं पंथियांच्या ताब्यात होती कालांतरानेमहायान पंथाच्या प्रभाव काळात गुंफा १०-१२ फुट आतमध्ये कोरुन त्यात बौध्द प्रतिमांची निर्मिती केली गेली असावी. विजय सातकर्णी नामक सातवाहन राजाने हया गुंफेची निर्मिती केली असे मत चंद्रपुरचा इतिहास चे लेखक अ.ज. राजूरकर यांनी मांडले आहे.[८]. परंतू ते सत्य वाटत नाही. पुर्वीपासून अस्तित्वात असलेल्या गुंफेत काही फेरबदल करुन विजय सातकर्णी ने ही गुंफा भिक्षूसंघास दान केली असावी.

## पवनी येथील स्तूप

**जगन्नाथ स्तूप -** पवनी हे गाव भंडारा जिल्हयातील एक महत्वपूर्ण तालुक्याचे ठिकाण असून भंडा-यापासून ४२ कि.मी. अंतरावर आहे. पवनी गावाच्या दक्षिणेस बालसमुद्र नावाचे तळे आहे. या तळयाच्या दक्षिण काठावर सुमारे ९ मीटर उंचीचे टेकाड असून त्यावर विसाव्या शतकात बांधलेले जगन्नाथाचे देऊळ आहे. या जगन्नाथ टेकडीचे उत्खनन फेब्रुवारी ते एप्रिल १९६९ या दरम्यान करण्यात आले. त्यात एका प्रचंड स्तुपाचे अवशेष उघडकीस आलेत.

उत्खननातील पुराव्यानुसार मुळचा स्तूप अशोकपूर्व काळात (इ.स.पुर्व तिस-या शतका आधी)बांधला गेल्याचे व त्यानंतर शुंग काळात (इ.स. पूर्व दुसरे शतक) या स्तुपाचे विस्तृतीकरण करण्यात आल्याचे दिसून आले. शुंग काळात या विस्तारीत स्तुपाभोवती दगडी कठडा प्रदक्षिणापथ आणि चार दिशांना प्रवेशव्दारे बांधण्यात आली.

मौर्य पूर्वकाळात बांधलेल्या या स्तूपाचा आकार गोलाकार होता. तसेच त्याचा व्यास ३८.२० मीटर असल्याचे आढळते. प्रस्तूत स्तूपाभोवती प्रदक्षिणापथ होता किंवा नाही याचा निश्चीत पुरावा मिळु शकला नाही. मौर्य शुंग काळात स्तुपाची डागडुजी व विस्तृतीकरण करण्यात आले. या विस्तृतीकरणामुळे स्तुपाचा व्यास ४१ मीटर इतका झाला. ह्या नविनीकरणामुळे स्तुपाचा परिघ आणखी वाढला. स्तुपाच्या अंडाचा भाग मोठा झाल्यामुळे पाया खचू नये यासाठी या बांधणीत ठिकठिकाणी काटकोणी चौकोनी आकाराच्या पेटीकांची योजना करण्यात आली. या पेटीकांमध्ये विटांचे तुकडे आणि करड्या रंगाचा चिखल भरल्या गेला होता. त्यामुळे स्तुपाच्या अंडाचे वजन मर्यादित राखले गेले.

पवनी येथे उपलब्ध झालेल्या पुराव्यांमुळे पेटिका पद्धतीच्या बांधणीच्या शैलीची प्राचीनता इ.स. पूर्व दूसऱ्या-तिसऱ्या शतकापर्यत मागे नेता आली.विस्तृत केलेल्या या स्तूपाच्या भोवती १.६० मिटर रुंदीचा प्रदक्षिणा पथ तयार करण्यात आला होता. प्रदक्षिणापथाच्या बाहेरच्या परिघाभोवती शुंगकाळात दणकट दगडी कठडा बांधण्यात आला या कठड्यात अष्टकोणी दगडी खांब एकमेकांपासून सूमारे दीड मिटर अंतरावर रोवण्यात आले. दोन खांबांमध्ये चार सुचीची योजना आढळुन येते. वरच्या तीन सूची व अष्टकोणी खांबावर उत्कृष्ठ मानवी शिल्पे व बुद्ध धर्माशी निगडीत चिन्हे जसे स्तूप, धर्मचक्र, कल्पवृक्ष बोधीवृक्ष, भद्रासन इत्यादी असून बुद्धप्रतिमेच्या अभावी ती हीनयान पंथीयांची आहेत. हे उघड होते[९] स्तूपाच्या अंडाचा वरील भाग मंदिराच्या बांधणीत नष्ट झाला असला तरी त्यावर दगडी हर्मिका व छत्रावली होती, असा पुरावा उत्खननात मिळाला आहे.

ह्या स्तुपाची डागडूजी व पूजा उत्तर सातवाहन व क्षत्रपकाळातही सुरु होती. ते वरच्या थरात सापडलेल्या सातवाहन क्षत्रप नाण्यांवरुन तसेच इ.स.च्या दुसऱ्या व तिसऱ्या शतकात भारतात व इतर ठिकाणी सापडलेल्या रोमन खापराच्या पवनी येथील उपलब्धीवरुन निश्चीत करता आले.

अशोक पूर्व ते क्षत्रपकाळात प्रसिद्ध असलेल्या ह्या स्तूपाच्या बांधणीत सामान्य जनांचे योगदान होते हे उत्खननात सापडलेल्या सुमारे पाऊणशे दान लेखांवरून सिध्द होते. इ.स. च्या तिस-या शतकानंतर पवनीच्या हया हिनयान बौध्द धर्मकेंद्राची महती नष्ट झाल्याचे दिसून येते.

**चांडकापुर स्तूप -** पवनी येथे जगन्नाथ स्तूपाच्या दक्षिणेस दीड कि.मी. अंतरावर चांडकापूर परिसरातील सुलेमान टेकडीवर इ.स. १९७० च्या सुमारास जाळे पध्दतीने(Grid pattern) आखून उत्खनन करण्यात आले. उत्खननात ७.५ मीटर उंच व ४१६ मिटर व्यासाच्या भव्य स्तूपाचे अवशेष उजेडात आले. या स्तूपाच्या घुमटाची बांधनी एका जाड कच्च्या व पक्क्या विटांच्या चौथ-याच्या बांधनीने करण्यात आली. भाजलेल्या विटांचा आकार 54X36X6 से.मी. आहे पक्क्या व कच्च्या विटांचे चौथरे एकावर एक जिण्याप्रमाणे परंतू निमुळते होत गेले अशा स्वरुपात बांधण्यात येवून स्तुपाच्या घुमटाची योजना करण्यात आली. स्तूपाच्या घुमटाला गोलाई यावी या दृष्टीने दोन चौथ-याच्या दोन्ही टोकांना माती व विटांचा भराव टाकून गोलाई आणण्यात आली. या स्तूपाच्या घुमटावर कशा प्रकारची हर्मिता व छत्रावली असेल याचा पडताळा पुराव्या अभावी घेता येणे शक्य झाले नाही.या स्तूपाची गणना भारतातील महास्तुपांमध्ये करता येते एवढा मोठा या स्तूपाचा आकार आहे. या स्तूपाचे वैशिष्टय असे की हया स्तूपाच्या मधोमध सुमारे आठ मीटर खोलीवर विटांनी बांधलेलीकुंडाकृती योजना मुद्दाम करण्यात आली होती. या कुंडाच्या मधोमध एक मृदघट आढळुन आला.

ह्या घटाचा आकार मडक्या सारखा असुन त्याच्या बाह्य पृष्ठभागावर तांबड्या लेपावर काळया रंगात जाड पट्टे रंगविण्यात आले होते. ह्या मडक्यात मानवी दातांचे व हाडांचे अवशेष ठेवण्यात आले होते. त्याच्या शेजारी २६ से.मी. व्यासाचा १.८९ मीटर लांब एक स्तंभ उभारण्यात आला होता.ह्या स्तंभावर छत्र सुद्धा असण्याची शक्यता आहे.हे अस्थिपात्र ठेवल्यानंतर त्यावर कच्च्या व पक्क्या विटांचा एक थर देऊन तो भाग बंद केला गेला. आतापर्यंत संशोधनात भारतात कोठेही असे भांडे सापडले नाही. मिळालेल्या अवशेषांवरुन असे वाटते की, हा स्तूप मुळात एखाद्या सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षुचे अवशेष जतन करण्यासाठी बांधण्यात आला असावा.[१०] मात्र पवनी येथील हा स्तुप कोणाच्या अस्थिंवर बांधण्यात आला हे कळण्यास मार्ग नाही.

उत्खननात सापडलेल्या नाण्यांच्या पुराव्यावरुन या स्तूपाचा काळ इ.स. पूर्व पहिले शतक असा निश्चित करण्यात आला, याचाच अर्थ चांडकापूर स्तूप जगन्नाथ स्तूपानंतर बांधण्यात आला. जगन्नाथ स्तूपाप्रमाणे ह्या स्तूपाभोवती प्रदक्षिणापथ कठडे वगैरे मिळाले नाहीत.

पवनी व चांडकापूर येथील उत्खनानावरुन पवनी व आजू बाजूच्या परिसर हीनयान बौद्ध धर्माचे एक सुसंपन्न केन्द्र होते हे सिद्ध झाले आहे.

**मनसरः-** नागपूर पासुन ४० कि.मी. अंतरावरील एक छोटेसे गाव मनसर हे प्राचीन काळात विदर्भातील फार मोठे धार्मिक केन्द्र होते. येथे तलावाच्या शेजारी नैसर्गिकरित्या दोन मोठ्या टेकड्या असुन त्यापैकी एक हिर्डीबा टेकडी या नावाने ओळखली जाते तर दुसरी टेकडी जवळच असुन तिची नोंद महाविहार अशी करण्यात आली आहे. या दोन्ही टेकडी परिसरात १९९८ पासुन केंद्रीय पुरातत्व विभाग आणि नागार्जुन बोधीसत्व शोध प्रतिष्ठानच्या वतीने उत्खनन कार्य हाती घेतले गेले.

हिडींबा टेकडीचा परिसर खडकाळ असुन ३.९० मीटर खाली, ८ मीटर व्यासाचे विटांच्या स्तुपाचे मौर्यकालिन अवशेष आढळतात. या विटांचा आकार 46X21X7 से. मी. आहे स्तुपाच्या पूर्वेकडील भागात असलेल्या टेकडीच्या उताराच्या दिशेने स्तुपाकडे येण्यास पायऱ्या बनविल्या गेल्या. स्तुपाभोवती १०५५ मीटर मातीचा मलबा घालुन तो पक्का करण्यात आला आणि सभोवती विटांची उंच भिंत उभारुन हा भाग देखणा व मजबूत करण्यात आला. हा पहिला स्तुप मौर्यकालिन म्हणजे इ.स. पुर्व दुसऱ्या शतकापासुन ते इ.स. च्या पहिल्या शतकाच्या कालावधीतील आहे.[११]

मनसर येथील हिडिंबा टेकडीवरील मौर्यकाळात बांधलेल्या स्तुपाची नंतरच्या काळात पडझड झाली. नंतर शुंग राजवटीच्या सुरुवातीच्या काळात या स्तूपावर नविन स्तुप बांधला गेला. यावेळी स्तुप बांधतांना लंब चौकौनी (बॉक्स ) खोके बनविले गेले व ह्या खोक्यांमध्ये पहिल्या स्तुपाचा मलबा, लहान बोल्डर्स व विटांचे तुकडे वापरले गेले. त्यामुळे विटा कमी लागल्या. या स्तूपातुन चुनरवडीच्या दगडापासुन बनविलेल्या धातु अवशेष मंजुषेच्या (Relic Casket) खालील भाग व त्याच्या झाकणाच्या वरील भागाचे तुकडे प्राप्त झाले आहेत. या स्तुपाच्या दक्षिण पूर्वभागात विटांनी बांधलेल्या ८ मीटर लांब व ५.५० मीटर (पूर्व- पश्चिम आयातकार चैत्यगृहाचे अवशेष मिळालेत.

तर दुसऱ्या एका मतानुसार महाविहार टेकडीवर जलाशयाच्या दिशेने एक राजवाडा बांधण्यात आला होता. वाकाटक राजा प्रवरेश्वर द्वितीय (इ.स. ४२० ते ४५५) याने आपल्या कारकिर्दीच्या अकराव्या ते सोळाव्या वर्षाच्या दरम्यान नंदिवर्धन वरुन आपली स्थलांतरितराजधानी प्रवरपुरला स्थलांतरित केली होती. तेव्हा हा राजप्रसाद इ.स. ४३५ च्या दरम्यान उभारण्यात आला.पुढे नळ राजा भवदत्तवर्मन याने हा प्रसाद इ.स. ५६३ च्या आसपास आक्रमणात पुर्णपणे जाळुन टाकला असावा.[१२]

इ.स. सहाव्या शतकात या वास्तुचा अधिष्ठानासारखा उपयोग करुन त्यावर तीन स्तरातउंचावत जाणारा प्रशस्त बौद्ध स्तुप उभारण्यात आला त्यासाठी ९० से.मी. चा प्रदक्षिणापथ ठेवण्यात आला. स्तुप निर्मीतीसाठी ४३X२३X ०९ से. मी. आकाराच्या पक्क्या भाजणीतील विटांचा उपयोग करण्यात आला. उत्खननात या भव्य स्तुपाची वेदिका आणि अंडाशयाच्या भागाचे अवशेष मिळालेत.

स्तुपाच्या सभोवती प्रदक्षिणापथास लागुन १६ लहान खोल्या निर्माण करण्यात आल्या होत्या. त्यासाठी पुर्वीच्या मुळ वास्तुच्या आराखड्यात ते परिवर्तन करण्यात आले होते. उत्खननात तेथे तांबड्या रंगाची खापरे तसेच बोधीवृक्ष व धम्मचक्राचे अंकण असलेल्या प्रतिमा मिळाल्या.

**अडम :-**हे गाव नागपूरच्या अग्नेयेला सुमारे ५५ कि.मी. अंतरावर वाघोर नदिच्या काठावर वसले आहे. १९८८ मध्ये पुरातत्व विभागाव्दारे करण्यात आलेल्या उत्खननात 'असक जनपदस्य' अशी ब्राम्हीलिपीत लेख असलेली मुद्रा मिळाली.त्यामुळे इ.स. पूर्व ६ व्या शतकात जी १६ जनपदे होती. त्यापैकी एक असलेले 'असक' जनपद इ.स. १०० ते २०० असा ठरविण्यात आला.[१३]

अडम गावात किल्ल्याच्या बाहेर पुर्व दिशेला सुमारे ५०० मीटर अंतरावर ''देवी हुडकी'' (उंच टेकाड) आहे. पुरातत्व विभागाने त्यांचे उत्खनन केले असता स्तूपाचे अवशेष मिळाले. स्तूपांची उंची ५.६० मीटर आणि परिघ ३४

मीटर आणि परिघ ३४ मीटर आहे. हा स्तूप माती आणि मुरुम यांनी बनविला होता. स्तुपाच्या मध्यभागी ३.५० मीटर व्यासाची हर्मिका होती. त्यात यष्टी आणि त्यावर छत्रावली असल्याचे पुरावे मिळाले.

स्तूपाच्या दक्षिण बाजुस दोन भिंती बांधलेल्या आढळल्या यापैकी पहिली भिंत एकेरी दगडाची बांधलेली असून तिचे आकारमान ९.८०X०.४० मीटर आहे. हि भिंत मौर्योत्तर काळातील असावी. सातवाहन काळात अशीच भाजलेल्या विटांची दुसरी भिंत बांधली गेली ती २२.२० मीटर लांब व १.२० मीटर रुंद आहे.[१४] प्रस्तुत स्तुपाच्या काही अंतरावरच एक नाला आहे. पुराच्या पाण्यापासुन प्रतिबंध करण्यासाठी या भिंतीची निर्मीती केली गेली असावी. उत्खननात सापडलेल्या एका मण्यावर उजवीकडे कठड्यामध्ये बोधीवृक्ष दाखविलेला असुन डाव्या बाजुस एक सांड त्आव वेगाने चाल करुन जात असल्याचे चित्रण केले आहे. या स्तुपाजवळच काळया दगडात बनविलेली पदचिन्हेयुक्त शिळाठेवलेली होती.

**भोन येथील स्तुप ;-** पश्चीम विदर्भाच्या बुलढाणा जिल्हयातील संग्रामपुर तालुक्याच्या शेगाव- वसाली रोडवर पातुर्डा फाट्या वरुन[१०] कि.मी. अंतरावर असलेल्या भोन या गावालगत पुणे येथील डेक्कन कॉलेजच्या पदव्युत्तर संशोधन संस्थेच्या पुरातत्व विभागामार्फत २००६ साली उत्खनन करण्यात आले. त्यात श्री. श्रीकृष्ण इंगळे व हरिभाऊ इंगळे यांच्या मालकीच्या शेतात मौर्यकालिन स्तुपाचे अवशेष आढळले.

या स्तुपाचा व्यास १४ मीटर एवढा असुन त्यासाठी वापरण्यात आलेल्या भाजल्या विटांचा आकार ५४X२८ X७ से. मी इतका आहे. यामध्ये स्तुपाचा प्रदक्षिणा मार्गसुस्थितीत आढळला असुन काही विटांवर ४अशा आकाराची चिन्हे रेखांकित केली आहेत. स्तुपावशेषाजवळ 'नंदिपाद' या नावाने ओळखली जाणार पादके आढळली असुन बौद्धकालात ते पवित्र चिन्ह म्हणुन ओळखले जात असे. स्तुपाच्या डोमाळा वर निमुळता गोलाकार आकार यावा म्हणुन विशेष आकारात बनविलेल्या विटांचा वापर बांधकामात केला गेला. स्तुपाभोवती १४ मीटर व्यासाचे प्रदक्षिणा पथ आहे. स्तुपाचा अभ्यास केल्यास तो इ.स. पुर्व तिसऱ्या- चवथ्या शतकापासुन पहिल्या शतकापर्यंतच्या कालखंडातील असल्याचे जाणवते[-१५].

भोन हे पश्चिम विदर्भातील पुर्णा खोऱ्यातील भक्कम तटबंदी व टेहळणी करीता बुरुज असणारे प्रमुख व्यापारी नगर किंवा केंद्र असावे.भोन हे येथील उत्खननाने इ.स.पूर्व तिसऱ्या व चवथ्या शतकात मौर्यकालीन स्तुप व लोकवस्ती या परिसरात होती हे स्पष्ट होते.भोन हे पश्चिम महाराष्ट्राशी जोडणारे महत्वपुर्ण शहर असावे व विविध कारणांनी उत्तरोत्तर या शहराचे महत्व कमी होत गेले असावे.

**नागार्जुन गुंफाः-** सातवाहन काळाच्या अखेरीस नागार्जुन हा महायान पंथाचा तत्वज्ञ झाला. त्याच्या काळाविषयी मतभिन्नता आहे. नागार्जुना 'सहल्लेख (मित्रालापत्र) या नावाचा ग्रंथ चिनी भाषेत सध्या उपलब्ध आहे. नागार्जुना महान बौद्ध तत्वज्ञ, शास्त्रज्ञ आणि महापंडित होता. इ.स. ४०५ मध्ये कुमार जीवाने चिनी भाषेत नागार्जुनाचे चरित्र लिहीले त्यात तो विदर्भातील एका ब्राम्हण कुळात जन्मला होता, असे सांगितले. या मतास विदर्भात प्रचलित असलेल्या एका दंतकथेचा पुरावा मिलतो.त्यानुसार एका ज्योतिष्याने नागार्जुनाला बालपणी सातव्या वर्षी मृत्यु येईल असे भविष्य वर्तविले. ही दुखःद घटना आपल्या डोळयासमोर घडु नये म्हणुन त्याच्या आई-वडीलांनी त्याला सेवकाच्या स्वाधीन करुन रामटेक येथे पाठविले. तेथे तो बौद्ध भिक्षुच्या सहवासाने एक गुहेत राहु लागला. तिला आजही 'नागार्जुन गुहा असे म्हणतात. अशा परिस्थितीत असतांना एके दिवशी महाबोधीसत्व अवलोकीतेश्वराने दर्शन देऊन त्याला नालंदा विहारात जाण्यास सागिंतले व त्याचा अपमृत्यु टळला व पुढे तो महान आचार्य झाला. त्याने 'शुन्यवाद' सिद्धांत मांडला.

रामटेक परिसरात सातवाहन काळी अनेक बौद्ध भिक्षु राहत असत. जवळच असलेल्या मनसर येथे या काळीच विशाल स्तुप बांधला गेला होता. रामटेक-मनसर परिसरात वाकाटक काळाच्या मध्यापर्यंत बौध्द धर्माचा प्रचार प्रसार होता. म्हणुनच प्रभावती गुप्तने आपल्या श्रद्धपुर ताम्रपटातरामगिरी स्वामी भगवान बुद्धाच्या पादुकांचा उल्लेख केला

आहे. यावरुन इ.स.४ थ्या व ५ व्या शतकापर्यंत हा प्रदेश बौद्ध वास्तूंनीं व अनुयायांनी गजबजलेला होता हे स्पष्ट होते.

## निष्कर्ष :-

विदर्भातील पवनी, अडम, मनसर, भोन या ठिकाणी उत्खनने झालीत त्यात इ.स. पुर्व ४ थ्या व तिसऱ्या शतकापासुन ते सातवाहन वाकाटक काळापर्यंत अस्तित्वात असलेल्या स्तुपांचे अवशेष सापडलेत. त्यातुन विदर्भातील बौद्ध धर्माच्या प्रचार प्रसाराची माहिती मिळते.

तसेच सालबर्डी गुंफा, विजासन लेणी, पातुरची लेणी, इत्यादींच्या अभ्यासावरुन प्राचीन कालखंडात विदर्भात बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता असे दिसून येते. विदर्भातील सर्वात प्राचीन मौर्यकालीन शिलालेख चंद्रपुर जिल्ह्यातील देवटेक ह्या ठिकाणी मिळालेला आहे. त्यामध्ये सम्राट अशोकाच्या धर्माज्ञा कोरलेल्या आहेत. विदर्भात अशोकाच्या धर्म महामंत्रांनी बौद्ध धर्माचा प्रसार केला. शुंग काळातही विदर्भात अनेक विटांची चैत्यगृहे व विहारांची निर्मिती झाली.

सातवाहन काळाच्या सुरुवातीस पवनी ह्या ठिकाणी चांडकापूर या महास्तुपाची भर पडली. दुसऱ्या शतकाच्या प्रारंभी कुषाण महाक्षत्रप रुपीअम्म ने पवनी येथे छायास्तंभ उभारला होता.

इ.स. च्या पहिल्या - दुसऱ्या शतकात विदर्भातील रामटेक, मनसर, भद्रावती, भोन, अडम, मुलचेरा, पातुर, सालबर्डी, पवनी, मांढळ, आदी परिसरात बौद्ध धर्मियांची संख्या मोठ्या प्रमाणात होती, व हे सर्व हीनयान पंथाशी संबंधित होते. सातवाहन काळात विदर्भात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात होता. गुप्त - वाकाटक काळात बौद्ध धर्माच्या महायान पंथाचा जोर होता. भद्रावती.रामटेक, मनसर पातुर इत्यादी ठिकाणी त्याची चिन्हे दिसुन येतात.

एकुणच इसवी सन पुर्व पाचव्या शतकापासुन ते इसविसनाच्या ६ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्म हा विदर्भातील एक प्रमुख धर्म होता.८ व्या-९ व्या शतकापासुन मात्र विदर्भात बौद्ध धर्माला उतरती कळा लागली.

## संदर्भ ग्रंथ सुची


१. मिराशी वा.वि. संशोधन मुक्तावली सर तिसरा, पृष्ठ क्रमांक ६२.
२. दी एज ऑफ इम्पिरिअल युनिटी - पृष्ठ -७९
३ मिराशी वा.वि. सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रपांचा इतिहास मुंबई-१९७९- पृष्ठ क्र. ७८
४ उपरोक्त पृष्ठ क्रमांक ४५ ते ४७
५ मेश्राम प्रदिप - विदर्भातील बुद्ध धम्माचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर -२००७
६ चितळे श्रिपाद के. विदर्भातील कोरीव गुंफा, प्रभुकृपा प्रकाशन, महाल, नागपूर २००२ पृष्ठ ६४-६५
७ अकोला जिल्हा गॅझेटिअर - महाराष्ट्र राज्य मुंबई १९७७ पृष्ठ क्र. ५३
८ राजुरकर अ.ज. चंद्रपूरचा इतिहास, हरिवंश प्रकाशन २००५ चंद्रपूर पृष्ठ क्र. ३७
९ मेश्राम प्रदिप - कित्ता पृष्ठ क्रमांक २२ ते २३
१० टेंभेकर नलिनी, पुर्व विदर्भातील ऐतिहासीक व प्रेक्षणीय स्थळे, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर -२०१० पृष्ठ क्रमांक २२९
११ मेश्राम प्रदिप - कित्ता पृष्ठ क्रमांक २७
१२ पाठक अरुणचंद्र रा. (संपादक) नागपूर जिल्हा गॅझेटिअर मुंबई-२००५, पृष्ठ क्र.३११-३१२
१३ एंपिग्राफिया इंडिका- खंड ४२--ठोसर हरिहर नागपूर जिल्ह्याचा प्राचिन ऐतिहासिक व सांस्कृतीक भुगोल, पृष्ठ क्र. ७२
१४ पाठक अरुणचंद्र (संपादक) कित्ता पृ-ष्ठ क्रमांक २३१
१५ मेश्राम प्रदिप - कित्ता पृष्ठ क्रमांक २८